# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील आदिवासी मुलामुलींच्या वसतीगृहात घडत असलेल्या विषबाधेच्या घटना थांबविण्याबाबत**

**(१) १२५२५ (१०-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी मुलामुलींच्या वसतीगृहात भोजन पुरविण्याचे बहुतेक ठेके महिला बचत गटांच्या नावे आहेत, परंतु अशा प्रकारचे महिला बचत गट अस्तित्वात नसल्याचे प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाहेरील ठेकेदार नेमण्यात आल्यामुळे त्यांनी पुरविण्यात आलेल्या भोजनामुळे वसतीगृहात नेहमीच विषबाधेच्या घटना घडत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वसतीगृहात वारंवार घडत असलेल्या विषबाधा थांबविण्याबाबत व भोजन पुरविणा-या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत तसेच स्थानिक ठेकेदारांची नेमणूक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींच्या वसतिगृहात विषबाधेच्या घटना वारंवार घडत असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रियदर्शनी शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या जागेवरील विमानतळाचा परवाना रद्द करण्याबाबत**

**(२) ३३५६३ (१४-०१-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्यावरण, सहकार व वस्त्रोद्योग तसेच वन खात्याची कोणतीही पूर्व परवानगी न घेता उभारण्यात आलेल्या प्रियदर्शनी शेतकरी सहकारी सूत गिरणीच्या जागेवरील विमानतळाचा परवाना रद्द करुन त्यांचेवर फौजदारी खटला दाखल करण्याबाबत धुळे येथील लोकप्रतिनिधींनी दिनांक ०६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास अनेक वेळा मा.वन, वित्त व नियोजन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) तदुनसार विमानतळाचा परवाना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) विमानतळाचा परवाना देणे व रद्द करण्याबाबत विषय केंद्र शासनाशी संबंधित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देणेबाबत**

**(३) ३५५३८ (२३-१०-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देताना विशेषत: समाजातील हुशार व आर्थिक दृष्ट्या गरीब मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यात यावे अशी मागणी माहे ऑक्टोंबर, २०१५ मध्ये मराठा विद्यार्थी बचाव कृती समिती, परभणीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारा केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनासोबत कोणत्या इतर मागण्या केल्या आहेत व या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रमाई घरकुल योजनेसाठी अनुदान मिळणेबाबत

**(४) ३५९६७ (१८-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये रमाई घरकुल योजनेसाठी अनुदान मिळणेबाबत विविध सामाजिक संघटनानी मा.सामाजिक न्याय मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अनुदान केव्हापर्यंत वितरीत करण्यात येणार आहे व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात रमाई आवास योजनेंतर्गत ग्रामीण क्षेत्रासाठी रु.६००.०० कोटी व शहरी क्षेत्रासाठी रु.२४४.०० कोटी असे एकूण रु.८४४.०० कोटी इतके अनुदान संबंधित कार्यान्वयन यंत्रणांकडे सुपुर्द करण्यात आले आहे.

तसेच सन २०१७-१८ करीता ग्रामीण क्षेत्रासाठी रु.६००.०० कोटी तरतूद अर्थसंकल्पित आहे व बीडीएसवर रु.५८०.०० कोटी तरतूद प्राप्त झाली. सदर तरतूद संबंधित कार्यान्वयन यंत्रणेकडे सुपुर्द करावयाची कार्यवाही सुरु आहे. आणि शहरी क्षेत्रासाठी रु.२००.०० कोटी अर्थसंकल्पीत तरतूदीपैकी रु.१४०.०० कोटी तरतूद संबंधित कार्यान्वयन यंत्रणांकडे सुपुर्द करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्याकरिता केंद्र शासनाला शिफारस करण्याबाबत

**(५) ७६००९ (२१-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सुरु केलेल्या बाजार हस्तक्षेप योजनेस महाराष्ट्र शासनाने प्रतिसाद न दिल्याने नाफेड मार्फत होणारी ११ हजार मेट्रीक टन कांदा खरेदी केंद्र सरकार करु शकले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांद्यांचे भाव पडल्याने केंद्र सरकारने प्रतिकिलो एक रुपया अनुदानाची घोषणा केली मात्र त्यासाठी लागणा-या अटी आणि शर्तीची पूर्तता करण्यात शेतक-यांना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाफेडमार्फत कांदा खरेदी करावी यासाठी केंद्र सरकारला शिफारस करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०८-२०१८) :** (१) कांदा चाळीमधील कांदा खरेदी करुन पुन्हा चाळीमध्ये ठेवल्यास मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असल्याने आणि कांद्याची किंमती स्थिर राहण्याची शक्यता असल्याने किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत कांदा खरेदी करु नये, असा निर्णय मा.मंत्री (पणन) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेतला होता. तसेच नाफेडच्या वतीने राज्यात राज्य अभिकर्ता संस्थाकडून खरेदी केली जाते. यापुर्वी सन १९९९-२००० मध्ये राबविण्यात आलेल्या बाजार हस्तक्षेप योजनेंतर्गत कांदा खरेदीमध्ये झालेली अनियमितता व रुपये २०० कोटीचा तोटा यामुळे ही योजना वादग्रस्त ठरलेली होती.त्यामुळे कादा खरेदी करण्याऐवजी केंद्रशासनाकडे झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना रुपये १००/- प्रति क्विंटल अनुदान देण्याबाबत केद्रशासन व राज्य शासन यांचा ५०:५० भाग असलेला प्रस्ताव केंद्रशासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास केंद्र शासनाने अशा प्रकारची योजना नसल्याने मंजूरी दिलेली नाही.

(२) राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना रुपये १००/- प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान देण्याकरीता शेतकऱ्यांसाठी पुढीलप्रमाणे अटी व शर्ती निश्चित केलेल्या आहेत:-

अ) ही योजना ज्या शेतकऱ्यांनी १ जुलै, २०१६ ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्री केली आहे, त्याचेसाठी लागू राहील.

ब) कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेखाली अनुदान मिळण्यासाठी कांदा विक्री पट्टीसह, ७/१२ चा उतारा, आपले बँक बचत खाते क्रमांक इ. सह साध्या कागदावर ज्या बाजार समितीकडे कांद्याची विक्री केलेली आहे तेथे अर्ज करावा.

या अटी पुर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांना अडचणी आलेल्या नाहीत.

(३) राज्यात कांद्याला मिळणाऱ्या हमीभावाच्या अनुषंगाने राज्यशासनाने पुढीलप्रमाणे विविध प्रस्ताव केंद्रशासनास सादर केले आहेत:-

अ) नाशिक जिल्ह्यात NAFED व SFAC मार्फत कांदा खरेदी करण्याच्या सुचना देण्याबाबत कृषि व सहकार विभागाचा प्रस्ताव

ब) कांदा निर्यातीसाठी रुपये १००००/- प्रति टन Transport Subsidy देण्याबाबत वाणिज्य विभागाला प्रस्ताव.

क) Price Deficiency Payment (PDPS) योजनेंतर्गत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना रुपये १/- प्रति किलो प्रमाणे २०० क्विंटलपर्यत अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव

ड) केंद्रशासन व राज्यशासन यांचा ५०:५० टक्के भाग असलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना रुपये १००/- प्रति क्विंटल अनुदान देण्याबाबत कृषि व सहकार विभागाचा प्रस्ताव.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय व निमशासकीय सेवेत असलेल्या पालकांच्या पाल्यांना नामांकित शाळांत प्रवेश देवू नयेत असे निर्देश दिल्याबाबत**

**(६) ७६३१९ (२८-०४-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय व निमशासकीय सेवेत असलेल्या पालकांच्या पाल्यांना नामांकित शाळांत प्रवेश देवू नयेत किंवा प्रवेश रद्द करावा असे निर्देश राज्यात शासनाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे शासनाच्या अनुसूचित जमातीच्या मुलांना नामांकित इंग्रजी शाळांत प्रवेश देण्याच्या योजनेनुसार नागपूर येथील तुली पब्लिक स्कुल मध्ये शिकत असलेल्या एका आदिवासी विद्यार्थीनीचा ऐन परिक्षेच्या कालावधीत शाळेतील प्रवेश रद्द केल्याने या विद्यार्थीनीचे भविष्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या विद्यार्थीनीच्या पालकांनी याविरोधात प्रकल्प कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा दिला असून शासनाने याची दखल घेत सदर विद्यार्थीनीचा शाळाप्रवेश रद्द न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) कुमारी सृष्टी अनराज येरमे या विद्यार्थीनीस सन २०१५-१६ मध्ये इयत्ता ५ वी मध्ये तुली पब्लिक स्कुल मध्ये प्रवेश देण्यात आला असून इयत्ता ६ वी पर्यंत नियमित शिक्षण सदर शाळेमध्ये घेतलेले आहे. परंतु शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये कु. येरमे ही इयत्ता ७ वी मध्ये प्रवेशीत असून सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात प्रथम दिवसापासूनच सदर विद्यार्थीनी शाळेमध्ये उपस्थित झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हदगांव (जि.हिंगोली) येथे स्वतंत्र सहाय्यक प्रकल्प अधिकारी**
**कार्यालयाची निर्मिती करण्याबाबत**

**(७) ७७२४५ (२८-०४-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगांव व हिमायतनगर (जि.हिंगोली) क्षेत्रातील आदिवासींच्या विकासासाठी स्वतंत्र सहाय्यक प्रकल्प अधिकारी कार्यालयाची हदगांव येथे निर्मिती करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे दिनांक ४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यापूर्वीही वारंवार मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२०-०७-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) हदगांव व हिमायतनगर तालुक्यातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या अनुक्रमे ११.६७ % व १६.८९% इतकी आहे. या दोन्ही तालुक्यात फक्त वैयक्तीक लाभाच्या योजना लागू आहेत. त्यामुळे तेथे नवीन कार्यालय सुरू करण्यास पुरेसा कार्यभार नाही. सबब, हदगाव येथे स्वतंत्र सहायक प्रकल्प अधिकारी कार्यालय सुरू करणे प्रशासकीय दृष्ट्या सोयीस्कर नाही.

---

**जळगांव जिल्हयात गेल्या दोन वर्षापासून आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत**

**(८) ७७३८१ (२८-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात गेल्या दोन वर्षापासून आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असून त्यांना लाभ मिळावा यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आदिवासी एकता विद्यार्थी परिषदेतर्फे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिष्यवृत्ती तसेच इतर विविध मागण्यांचे निवेदनही जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१) व (२) मुलजी जेठा महाविद्यालय व धनाजीनाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय या दोन महाविद्यालयांनी विहीत मुदती नंतर तसेच सन २०१५-१६ हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर विलंबाने प्रस्ताव सादर केले. त्यामुळे सन २०१५-१६ या वर्षाची शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मिळाली नसल्यामुळे आदिवासी एकता विद्यार्थी परिषदेतर्फे दिनांक १८.१०.२०१६ रोजी जिल्हाधिकारी, जळगांव यांना निवेदन सादर करण्यात आले होते.

(३) विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज व जात वैधता प्रमाणपत्र महाविद्यालयास उशिराने सादर केल्यामुळे तसेच शासकीय वसतीगृहात राहत असलेल्या विद्यार्थ्यांनी वसतीगृहाची माहिती तसेच इतर माहिती चुकीची भरल्याने विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्रकल्प कार्यालयास सादर करण्यास सदर महाविद्यालयाकडून विलंब झालेला आहे.

विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज सन २०१६-१७ मध्ये प्राप्त झाल्याने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जनता बझार, कोल्हापूर या कन्झुमर्स स्टोअरच्या सन २०११ ते २०१५ या कालावधीतील लेखापरिक्षणात त्रुटी असल्याबाबत**

**(९) ७८१०३ (२१-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जनता बझार, कोल्हापूर या कन्झुमर्स स्टोअरच्या सन २०११ ते २०१५ या कालावधीतील लेखापरिक्षणात अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संस्थेच्या संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०१-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) लेखापरिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गैरव्यवहार व अपहाराबाबत विशेष लेखापरिक्षक यांनी विनिर्दिष्ट अहवाल दि २७.०१.२०१७ रोजी सादर केलेला असून प्रस्तुत संस्थेच्या सन २०१२ ते २०१५ अखेर या मुदतीच्या वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या रु. ६४.७६ लाख इतक्या रकमेचा अपहार झाल्याबाबत गुन्हा लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.र.नं. ३६/२०१७, दि. १९.०२.२०१७ रोजी नोंदविला आहे.
(४) लागू नाही.

---

### राज्यातील शासन पुरस्कार सन्मानित आदिवासी सेवकांच्या मागण्यांबाबत

**(१०) ७९७२६ (२८-०४-२०१७). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासन पुरस्कार सन्मानित आदिवासी सेवकांना स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे रेल्वेमध्ये दोन व्यक्तींना एसी-३ श्रेणींचा प्रवास विनामूल्य देण्याबाबत, आदिवासी सेवकांना प्रतिमाह मानधन रु.१५०००/- देणे, प्रकल्पस्तरीय समित्यांवर नियुक्ती करण्याबाबतच्या मागण्यांबाबत लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी मा. आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (२९-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आदिवासी सेवक पुरस्कार देण्यासाठी, प्रत्येक वर्षी विविध व्यक्ती व संस्थांची निवड करुन त्यांना विहीत रक्कम देऊन सन्मानीत करण्यांत येते. आदिवासी सेवक पुरस्कार प्राप्त व्यक्तींना मानधन किंवा प्रवास सवलत देण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

---

### नरखेड (ता.काटोल, जि.नागपूर) येथील शेतक-यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्याबाबत

**(११) ८३४९८ (२१-०४-२०१७). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (ता.काटोल, जि.नागपूर) येथील संत्रा उत्पादकांचे मागणी घटल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सोयाबीन हे या भागातील शेतक-यांचे मुख्य पीक आहे परंतु सोयाबीनचे भाव रू.२५०० क्विटंल बाजार भाव असून इतक्या कमी किंमतीत उत्पादन खर्च सुद्धा निघत नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गतवर्षी तुर पीकाला १० हजार रूपये भाव होता या वर्षी ४ हजार भाव असल्याने शेतकरी अडचणीत आला असून याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (३०-०७-२०१८) :** (१) नाही.

नरखेड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये नोव्हेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या कालावधीत संत्रा या पिकाची आवक झालेली नाही.
(२) हंगाम २०१६-१७ मध्ये सोयाबीनसाठी जाहिर केलेली किमान आधारभूत किंमत रुपये २७७५+(१०० रुपये बोनससह)प्रति क्विंटल होती. राज्यात सोयाबीन उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्याने बाजारातील आवक वाढून दर कमी झालेले होते. त्यावेळी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत सोयाबीनची खरेदी सुरु करण्यात आली होती तथापि, त्यानंतर बाजारातील दरात सुधारणा झाल्याने या योजनेंतर्गत सोयाबीनची खरेदी १६४२ क्विंटल झाली आहे.

तसेच राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये ऑक्टोबर, २०१६ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत सोयाबीनची विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये २००/- प्रति क्विंटल आणि २५ क्विंटल प्रति शेतकरी या प्रमाणात अनुदान मंजूर करण्यात आले आहे.
(३) हंगाम २०१५-१६ मध्ये दुष्काळामुळे तूरीची उत्पादन फारच कमी झाल्याने तूरीचे बाजारभाव रुपये १०,०००/- प्रति क्विंटल होते. मात्र हंगाम २०१६-१७ मध्ये मोठ्या प्रमाणात तूरीचे उत्पादन झाल्याने बाजारभाव ४००० आसपास होते. या पार्श्वभुमीवर शेतकऱ्यांना कमी किंमतीत शेतमालाची (तूरीची) विक्री करावी लागू नये यासाठी राज्यात केंद्रशासनाच्या व राज्यशासनाच्या विविध योजनेंतर्गत किमान आधारभूत दराने (रु.५०५०/-) एकूण ७.६९ लाख मे.टन तूरीची खरेदी करण्यात आली आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुसद, नेर, दिग्रस, दारव्हा, महागाव (जि.यवतमाळ) या तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत

**(१२) *८४६५२* (२८-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी शिष्यवृतीसाठी पात्र असलेल्या पुसद, आर्णी, नेर, दिग्रस, दारव्हा, महागाव (जि.यवतमाळ) या तालुक्यांतील आदिवासी विद्यार्थ्यांची माहे जुन, २०१६ पासूनची शिष्यवृती

पैसे उपलब्ध असतानाही मुख्याध्यापकांच्या तांत्रिक चुकीमुळे मिळाली नसल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शाळेच्या मुख्याधापकांनी विद्यार्थांचे ऑनलाईन अर्ज भरताना बँक खाते क्रमांक चुकवल्याने काही ठिकाणी स्वत:चे बँकखाते नमुद केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयाने मुख्यधापक आणि गटशिक्षण अधिकारी यांना विद्यार्थ्यांचे खाते क्रमांक व्यवस्थित भरण्याची सुचना दिली असतानाही खाते क्रमांकामध्ये अनेक त्रुटी आढळल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृती मिळाली नसून शासनाने मुख्याधापकांची चौकशी करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पुसद यांनी विद्यार्थ्यांच्या खाते क्रमांकामध्ये त्रुटी असल्याबाबतची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्या निदर्शनास आणून दिली असून विद्यार्थ्यांना शिष्यवृती अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य सहकारी बँकेच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१३) ८५०१६ (१८-०८-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकारी बँकेतील कोट्यावधीच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत ३० महिने होऊनही चौकशी पूर्ण होत नसल्याने, मा.सहकार मंत्री यांनी सदर गैरव्यवहाराची निवृत्त न्यायाधिशांद्वारे सहा महिन्यात चौकशी करण्याचे दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सभागृहात जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधिशांची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर प्रकरणात निवृत्त न्यायाधिशांनी माहे जून, २०१७ अखेरपर्यंत केलेल्या चौकशीच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२२-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) सदरच्या चौकशी कामकाजासाठी विधी सहाय्यक (Legal Assistant) म्हणून सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधिश यांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी अप्पर निबंधक, सहकारी संस्था हे चौकशी करीत असून सहकार, पणन व

वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक १३/६/२०१७ च्या आदेशाद्वारे चौकशी पूर्ण करण्यासाठी दिनांक ३०/०६/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील कळमेश्वर येथील बुध्दवन (रामगिरी) पर्यटन स्थळाच्या विकासाकरीता निधी मिळण्याबाबत**

**(१४) ८६२२९ (१८-०८-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील कळमेश्वर येथील बुध्दवन (रामगिरी) पर्यटन स्थळाच्या ठिकाणी सामाजिक कैंद्राचे बांधकाम करण्यासाठी दोन कोटी रूपयांचा प्रस्ताव अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर (प्रस्ताव क्रमाक १३६३/तावि/प्र.अ.४/दिं.४/३/२०१७) यांच्यावतीने सहायक आयुक्त नागपूर (प्रस्ताव क्र आसकना/डॉ.बा.आ.१२५ जयंती/२३४८/२०१७-१८/नागपूर) नुसार आयुक्त समाजकल्याण विभाग पुणे यांच्याकडे पाठविले असून सदर प्रस्तावास अंतिम मंजूरी मिळण्याकरीता समाजकल्याण विभाग,मंत्रालय येथे पाठविण्यात आले. मात्र सदर प्रस्तावास अद्यापही मंजूरी मिळालेली नसल्याची माहिती दिंनाक १६ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हयातील कळमेश्वर येथील बुध्दवन (रामगिरी) पर्यटन स्थळांचा विकास करण्याकरीता स्वंयसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने २२५३, ३६३६ या लेखाशिर्षाखाली शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्राप्त प्रस्तावांना मजुरी देण्यास्तव मा.मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत दोन कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामास त्वरीत मंजूरी मिळण्याबाबत लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदनाव्दारे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावास तातडीने प्रशासकीय मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय,
(३) हे खरे नाही.
उपलब्ध अभिलेख्यावरुन निवेदन आढळून आले नाही.
(४) नागपूर जिल्हयातील कळमेश्वर येथील बुध्दवन (रामगिरी) पर्यटन स्थळाचा विकास करण्याकरीता स्वंयसेवी संस्थांना सहाय्यक अनुदाने २२५३ ३६३६ या लेखाशीर्षाखाली दि. १५/१/२०१८ रोजी रु.१,९९,७६,०००/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमी स्मारक परिसरातील विविध विकास कामांबाबत**

**(१५) *८९१८८* (१८-०८-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील मुक्तीभूमी स्मारक परिसरातील विविध विकासकामे करणेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी (पुणे) यांनी दिनांक १८ ऑक्टोंबर,२०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ फेब्रुवारी, २०१७ व दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व प्रश्न भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी असलेल्या घरकुल योजनेंतर्गत लाभार्थी प्रतिक्षेत असल्याबाबत**

**(१६) *८९३१५* (१८-०८-२०१७). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागातर्फे घरकुल योजना राबविली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी असलेल्या घरकुल योजनेची अंमलबजावणी क्रियान्वयन एजन्सी म्हणून नागपूर महानगरपालिका काम करते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समाजकल्याण विभागातर्फे वेळेवर निधी मिळत नसल्याने ही योजना कागदावरच असून शहरात केवळ ७०५ लाभार्थ्यांना घरकुल मिळाले असून अन्य लाभार्थी प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय.
(३) जुलै, २०१७ पर्यंत ८४३ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. लाभार्थ्यांद्वारा कागदपत्रांची पुर्तता विहित कालावधीत होत नसल्यामुळे कार्यवाहीस विलंब होत आहे.
(४) आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या दि.२७.३.२०१७ च्या पत्रान्वये रु.२५००.०० लक्ष निधी घरकुल योजनेकरीता महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या इमारत बांधकामासाठी मंजूर केलेल्या जागेचा ताबा देण्याबाबत**

**(१७) ९०४५१ (१८-०८-२०१७). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाच्या इमारत बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या जागेचा ताबा देण्यास दिरंगाई होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून दिरंगाई करणा-या अधिका-यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०१-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनास जिल्हाधिकारी, अकोला यांच्या दि.२०/१/२०१७ च्या आदेशान्वये ८९३८ चौ.मी.जागा प्राप्त झाली आहे. तसेच दि.१०/७/२०१७ रोजी जागेचा ताबा प्राप्त झाला आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तोट्यात असल्याबाबत**

**(१८) ९१५४१ (१९-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १२ हजार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तोट्यात असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांना होणारा पतपुरवठा भक्कम होण्यासाठी सेवा सहकारी संस्थांना सक्षम करण्याकरिता नाबार्ड, केंद्र शासनासमवेत झालेल्या करारामध्ये ३० टक्क्यांपेक्षा कमी वसुली असल्यामुळे सुमारे ५७३८ सेवा सहकारी संस्थांना आर्थिक मदत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतक-यांना गावपातळीपर्यंत कर्जवितरणाची सेवा देण्याकरिता या संस्थांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०६-२०१८) :** (१) राज्यात १२८७७ वि.का.स. संस्था तोट्यात असल्याचे निदर्शनास आले  आहे.
(२) होय.
(३) राज्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने दि.०६/०९/२०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित केला असून त्यामध्ये नमूद निकषांची पूर्तता करणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना त्यांचा व्यवस्थापन व आस्थापना खर्च भागविण्यासाठी कर्ज वाटपाच्या प्रमाणात अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. शासन निर्णय दि. २.८.२०१७ अन्वये या निकषांपैकी काही निकष वगळले आहेत व काही निकष सुलभ केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा येथील विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत**

**(१९) ९२५५३ (०९-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयातील आदिवासी विद्यार्थीनीनी जी.एन.एम आणि आर.ए.एन.एम. या अभ्यासक्रमाला सन २०१५ ते २०१६ या वर्षामध्ये यवतमाळ येथील नर्सीग महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतला असून आदिवासी प्रकल्प कार्यालय पांढरकवडा (ता.केळापूर) येथे शिक्षण शुल्क व इतर खर्चाकरिता शिष्यवृती मिळण्याबाबत अर्ज केला असता त्यांना शिष्यवृती मिळाली नसल्याचे दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिष्यवृती न मिळाल्याने चालु वर्षाचे परिक्षा शुल्क भरण्यात आले नाही व त्यामुळे महाविद्यालयामध्ये त्यांना दुस-या वर्षाला प्रवेश देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विद्यार्थीनींचे शैक्षणिक नुकसान होऊ नये करिता शासनाने शिष्यवृती देण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१) सन २०१५-१६ या वर्षाकरीता पात्र असलेल्या जी.एन.एम. आणि आर.ए.एन.एम. या अभ्यासक्रमाच्या ६ महाविद्यालयातील १७ पात्र विद्यार्थ्यांना रुपये १०,८३,९३१/- इतकी शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासनाच्या दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार जी.एन.एम आणि आर.ए.एन.एम या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या सक्षमीकरणाबाबत**

**(२०) ९५२६२ (०६-०१-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाच्या सक्षमीकरणासाठी शासनाने समिती गठीत केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील किती जिल्हा बँका आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत व त्या कोणत्या आहेत तसेच सदर बँकेच्या सक्षमीकरणासाठी शासनाने अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने जिल्हा बँक सक्षमीकरणासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२५-०७-२०१८) :** (१) होय.
शासनाने शासन निर्णय दिनांक ०६/११/२०१७ अन्वये राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतपुरवठा संरचनेचे मुल्यमापन करुन त्याबाबत शासनास आवश्यक ती उपाययोजना सुचविण्यासाठी तज्ञ समिती गठीत केली आहे.
(२) राज्यातील नाशिक, धुळे-नंदूरबार, जळगांव, सोलापूर, जालना, परभणी, बीड, उस्मानाबाद, नांदेड, अमरावती, यवतमाळ, बुलडाणा, वर्धा व नागपूर या १४ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आर्थिकदृष्ट्या अडचणीत आहेत.
उक्त समितीचा अहवाल प्राप्त झालेला नाही.
(३) समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील चर्मकार समाजातील नागरिकांच्या मागण्यांबाबत**

**(२१) ९५७४८ (०६-०१-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चर्मकार समाजातील नागरीकांना देण्यात आलेले गटई कामगारांचे स्टॉल हटविण्याची कारवाई थांबवावी, त्यांना जोडधंदा करण्यास परवानगी द्यावी तसेच इतर मागण्यांसाठी चर्मकार समाजाने दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास मुंबईतील आझाद मैदानामध्ये धरणे आंदोलन करुन सदर प्रकरणी सचिव, सामाजिक न्याय यांचेकडे निवेदनाव्दारे वारंवार मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चर्मकार समाजाच्या समस्या सोडविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०२-०७-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) चर्मकार समाजाच्या मागण्यांच्या संदर्भात दिनांक ०३.१०.२०१७ रोजी बैठक घेण्यात आली. सदरहू बैठकीमध्ये, गटईस्टॉल योजना डिबीटीतुन वगळावी, मुंबई महापालिका क्षेत्रातील स्टॉल हलवू नये, पुरस्कारांच्या रक्कमेत व संख्येत वाढ करावी, कर्ज प्रकरणात जामिनदाराच्या कार्यालयाच्या हमीपत्राची अट रद्द करावी, एनएसएफडीसी यांच्या हमीची मुदत वाढवावी, लिडकॉम मधील रिक्त पदे भरावित अशा स्वरुपाच्या मागण्या मांडण्यात आल्या.

सदरहू बैठकीत झालेल्या चर्चेनुसार गटई स्टॉल योजना दिनांक ०७.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये डिबीटी प्रक्रियेतून वगळण्यात आली आहे.

तसेच, मुंबई महानगर पालिका हद्दीतील गटई स्टॉल हलविण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका व नगर विकास विभागाचे अधिकारी बैठकीत उपस्थित नसल्याने, या प्रकरणी पुन्हा बैठक आयोजित करण्याचे व उर्वरीत मागण्यांबाबत नियमानुसार तपासून सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील महाजनको औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी येथील माजी सैनिक सुरक्षा रक्षक संघटनेच्या मागण्याबाबत**

**(२२) ९५८१५ (२९-१२-२०१७). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महाजनको औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी येथे कार्यरत असलेले माजी सैनिक सुरक्षा रक्षक महामंडळ संघटनेने आपल्या मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री मा.उर्जा मंत्री व मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा) महानिर्मिती, मुंबई यांना दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माजी सैनिक सुरक्षा रक्षक संघटनेच्या मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) औष्णिक विद्युत प्रकल्प, कोराडी येथे कार्यरत असलेले महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या सुरक्षा रक्षकांचे कंत्राट दि. ३०.०९.२०१७ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे त्यांना कमी करण्यात येऊ नये आणि नवीन कंत्राट कोणत्याही कंत्राटदार कंपनीला मिळाल्यास महाराष्ट्र माजी सैनिक सुरक्षा रक्षक महामंडळाच्या सुरक्षा रक्षकांची सेवा नियमित ठेवावी, ही प्रमुख मागणी होती.

(३) महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) यांची निविदा संपण्यापूर्वी त्यांना ०१ वर्षाची मुदतवाढ महानिर्मिती कंपनीकडून देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जय आंबिका सहकारी साखर कारखाना लि., कुंटुर (ता.नायगांव, जि.नांदेड) यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाच्या थकबाकीबाबत**

**(२३) ९६९०६ (०६-०१-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जय आंबिका सहकारी साखर कारखाना लि., कुंटुर (ता.नायगांव, जि.नांदेड) च्या संचालक मंडळाने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून सदर कारखान्यासाठी कर्ज घेतांना कर्जाची परतफेड न झाल्यास स्वतःची मालमत्ता विक्री करून कर्जाची परतफेड करण्यात येईल असा करार कारखान्याच्या संचालक मंडळाने बँकेला करून दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून सदर कारखान्याची आजपर्यंत थकबाकी वसूल करण्यात आली आहे काय,
(४) सदर कर्जाची पूर्ण रक्कम वसुली करण्यात आली नसल्यास, उपरोक्त करारानुसार कारखान्याच्या संचालक मंडळाविरूध्द तसेच संचालकांच्या मालमत्ता जप्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०७-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) राज्य बँकेने सेक्युरिटायझेशन कायदा २००२ अंतर्गत कारखान्याची संपूर्ण मालमत्ता विक्री केली असून राज्य बँकेचे रूपये ३१.१३ कोटी वसूल झालेले आहेत.

दिनांक ३१/१२/२०१७ अखेरीस कारखान्याकडे रूपये १६३.५२ कोटी थकबाकी आहे.
(४) कारखान्याकडील थकबाकी वसुलीस्तव कारखान्याचे संचालक मंडळाने करून दिलेल्या वैयक्तिक व सामुदायिक हमी पत्राआधारे राज्य बँकेने सहकार न्यायालय, नांदेड येथे दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मागासवर्गीयांकरीता अर्थसंकल्पात तरतूद असलेली शिष्यवृत्तीची रक्कम अखर्चित असल्याबाबत

**(२४) ९७०४६ (१०-०१-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागासवर्गीयांसाठीचे मागील ३ वर्षांच्या अर्थसंकल्पात शिष्यवृत्तीचे ८ हजार कोटी रुपये अखर्चित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसुचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा अनुशेष १५ हजार कोटीवर गेला असल्याचे समाजकल्याण विभागाकडून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुसुचित जाती व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गत ३ वर्षांपासून चौकशीच्या नावाखाली शिष्यवृत्ती वाटप होण्यास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील शिष्यवृत्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराच्या अनुषंगाने प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्तांची व शिष्यवृत्ती संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) हे खरे नाही
(४) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटप गैरव्यवहारा संबधात विशेष चौकशी पथकाने सादर केलेल्या अंतिम अहवालातील लेखापरीक्षणातील आकडेवारीची पडताळणी, वसूलपात्र रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही आणि संबंधित अधिकारी यांच्याविरुध्द जबाबदारी निश्चितीची प्रशासकीय कार्यवाही आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यास्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील फोंडशिरस संस्थेच्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ न मिळाल्याबाबत**

**(२५) ९७५८२ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील फोंडशिरस सहकारी संस्थेचे शेतकरी सभासद हे नियमित कर्ज फेड करत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात तीन वेळा शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दुष्काळी परिस्थिती असूनही नियमित कर्ज फेडणारे शेतकऱ्यांना कर्ममाफीचा लाभ मिळाला नसल्याने फोंडशिरस संस्थेने ठराव करून शासनाचा निषेध केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना - २०१७ अंतर्गत शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१७ तसेच दिनांक ७/१२/२०१७ व दिनांक १२/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये योजनेत केलेल्या बदलानंतरच्या तरतूदी विचारात घेता, फोंडशिरस, ता.माळशिरस जि.सोलापूर या संस्थेतील ६० सभासदांपैकी दोन सभासदांचे कर्ज वाटप हे दि.०१/०४/२०१५ पूर्वीचे होते. सन २०१५-२०१६ या वर्षामध्ये ५८ वाटप झालेल्या कर्जदार सभासदांपैकी एकूण ४३ सभासदांची नांवे ग्रीन लिस्टमध्ये आहेत. त्यापैकी ४२ सभासदांच्या खात्यावर कर्जमाफीच्या लाभाची रक्कम जमा झाली आहे व एका सभासदाचे नाव आधार कार्डाचा उल्लेख नसल्याने दुरूस्तीसाठी परत केले आहे. ५८ पैकी १५ सभासदांची नावे मिसमॅच यादीमध्ये प्राप्त झाली होती. ती दुरूस्त करून अपलोड केली आहेत.

शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१७ नुसार संस्थेचे नियमित कर्जफेड करणारे सभासद योजनेस पात्र ठरत नसल्यामुळे कर्जमाफीच्या निषेधाचा ठराव दिनांक ५/९/२०१७ च्या वार्षिक

सर्वसाधारण सभेत केला होता. तथापि, दिनांक ७/१२/२०१७ व दिनांक १२/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये योजनेत केलेल्या बदलानंतर वरीलप्रमाणे फोंडशिरस संस्थेचे ४३ सदस्य कर्जमाफीस पात्र ठरले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साक्री (जि.धुळे) तालुक्यातील मुस्लीम शाह फकीर या समाजास विमुक्त जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत असल्याबाबत

**(२६) ९८३८८ (०६-०१-२०१८). श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साक्री (जि.धुळे) तालुक्यातील मुस्लीम शाह फकीर या समाजास दिनांक २३ मार्च, २०११ च्या शासन निर्णयाने जात प्रमाणपत्र देणे बंधनकारक केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील मुस्लीम शाह फकीर (छप्पर बंद) या समाजास विमुक्त जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळण्यास अडचणी येत असल्यामुळे या समाजातील लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०७-२०१८) :** (१) नाही.

छप्परबंद (मुस्लीम धर्मियांसह) या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राबाबतच्या मार्गदर्शक सूचना शासन परिपत्रक दि.२३/०३/२०११ अन्वये देण्यात आल्या होत्या, तथापि, मा.उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे दाखल याचिका क्र.२८०२/२०१४ मध्ये दि.०४/१२/२०१४ रोजी मा.न्यायालयाने पारित केलेल्या आदेशास अनुसरून शासन परिपत्रक दि.२३/०३/२०११ हे शासन परिपत्रक दि.१६/०२/२०१५ अन्वये रद्द करण्यात आले आहे.

(२) मुस्लीम शाह फकीर (छप्परबंद) जातीच्या व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून केली जाते. त्यासाठी जात प्रमाणपत्र देणे व जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कामकाज हे सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ तसेच त्या अंतर्गत तयार करण्यात आलेले नियम,२०१२ मधील तरतुदीनुसार तसेच मा.उच्च व मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार चालते. सदर नियमानुसार जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता आवश्यक ते जातीचे पुरावे, कागदपत्रे देण्यात आल्यास, सदर प्रमाणपत्र प्राप्त होण्यास कोणतीही अडचण उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागोठणे (जि.रायगड) येथील ईथेन वायू वहन करणाऱ्या वाहिनीच्या प्रकल्पाच्या कामामुळे पेण तालुक्यातील पाबळ विभागातील शेतकऱ्यांच्या जमिनीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२७) ९८७४६ (०३-०१-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (जि.रायगड) येथील रिलायन्स इंडस्ट्रीजच्या ईथेन वायूचे वहन करणाऱ्या वाहिनीच्या प्रकल्पाच्या कामामुळे पेण तालुक्यातील पाबळ विभागातील शेतकऱ्यांच्या जमिनीची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बाबींची चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२६-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

सार्वजनिक हिताच्या दृष्टीने ईथेन द्रवरुप वायूचे वहन करण्यासाठी गुजरात राज्यातील दहेज ते महाराष्ट्र राज्यातील नागोठणे, जि.रायगड पर्यंत दहेज ते नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्पास केंद्र शासनाच्या दिनांक २०.०८.२०१७ च्या पत्रान्वये मंजूरी दिली आहे.

दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्पात पेण तालुक्यातील गावातील काही जमिनीच्या वापराच्या हक्काचे संपादन पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन अधिनियम १९६२ चे कलम ६(१) अधिसूचना दिनांक ३०/०५/२०१६ च्या राजपत्रात केंद्र शासनाने प्रसिध्द केली आहे. त्याअनुषंगाने पेण तालुक्यातील पाबळ विभागातील मौजे कलद व जिर्णे येथील प्रकल्पात बाधीत जमिनींचे संपादन केले आहे. माहे डिसेंबर २०१६ पासून जिर्णे येथील जमिनीत १ मिटर खोली प्रकल्पाची पाईपलाईन टाकण्याचे काम प्रकल्प संस्थेच्या स्तरावरुन सुरु आहे. त्यापैकी जिर्णे येथील बाधीत जमीनीत पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण झाले असून, ५० टक्के जमिनी पूर्ववत केल्या आहेत.

दहेज-नागोठणे ईथेन पाईपलाईन प्रकल्पात जमिनीच्या वापराच्या हक्काचे संपादन झालेल्या जमिनीची / पिकांची / झाडांची व इतर नुकसान भरपाई पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम १९६२ चे कलम १० मधील तरतुदीनुसार तसेच, प्रत्यक्ष जागेवर झालेल्या पंचनामा संबंधितांचे संमतीपत्र / प्रतिज्ञापत्रानुसार नुकसान भरपाई वाटपाची कार्यवाही सुरु आहे. यात विलंब झाला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निफाड तालुक्यातील ३५ गावांचा छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेच्या ऑनलाईन यादीत सामावेश करण्याबाबत**

**(२८) १०००४२ (२७-१२-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड तालुक्यातील ३५ गावांचा छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेच्या ऑनलाईन यादीत समावेश नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती निफाड तालुक्यातील ३५ गावांचा छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी योजनेच्या ऑनलाईन यादीत समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) योजनेच्या पहिल्या टप्प्यात निफाड तालुक्यातील काही गावांची नावे तांत्रिक अडचणीमुळे ऑनलाईन दिसत नव्हती. तथापि शासनाने योग्य ती कार्यवाही करून निफाड तालुक्यातील सर्वच्या सर्व गावांचा ऑनलाईन यादीत समावेश केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत नामांकित शाळांमध्ये सी-९९९ योजनेखालील अनुदान वाटपात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(२९) १००१३४ (२९-१२-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सी-९९९ योजनेखालील सोलापूर प्रकल्पांतर्गत अनेक तक्रारी शासनाला प्राप्त असतानाही या योजने अंतर्गत नामांकित शाळांमध्ये अनुदान वाटप करण्यात येत होते व त्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थाचालक व प्रकल्प अधिकारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणावर संस्थेच्या नावावर बनावट अनुदान घेवून उक्त योजनेत गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधीत दोषी अधिकारी व संस्थाचालक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी प्रकल्पस्तरीय समितीने तसेच उप आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याकडून सदर शाळांची तपासणी/चौकशी करण्यात आलेली आहे.

चौकशी अहवालानुसार संबंधित शाळांची “नामांकित शाळा” म्हणून असलेली मान्यता रद्द करण्यात येऊन तेथील विद्यार्थ्यांना नजीकच्या “नामांकित शाळेत” प्रवेश देण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई तसेच मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल झालेल्या आहेत व प्रकरणे सध्या न्याय प्रविष्ठ आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्पांतर्गत येणाऱ्या आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनी वसतिगृहापासून वंचित असल्याबाबत**

**(३०) १००१४७ (२९-१२-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्पांतर्गत येणाऱ्या डहाणू, तलासरी, वसई तालुक्यातील (जि.पालघर) एकूण ६६६ आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनी वसतिगृहापासून वंचित असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकषीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने वसतीगृहांपासून वंचित असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थीनीना वसतिगृह उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१), (२) व (३) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू अंतर्गत अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींकरिता एकूण १७ शासकीय वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांची एकूण मंजूर क्षमता १४५० इतकी असून त्यामध्ये सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात १५६० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

त्याचप्रमाणे वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (जि.लातूर) यांनी दिलेल्या अहवालावर कारवाई करण्याबाबत**

**(३१) १००२१६ (०६-०१-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील लातूर औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडे त्यांचा अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालानुसार एकूण १०० भुखंडांपैकी १३ भुखंडांवरील उद्योग बंद असून उर्वरित ८४ भुखंडावरील उद्योग हे नोंदणीकृत उद्योग नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर अहवालानुसार उद्योगासाठी असलेल्या भुखंडांवर उद्योगाव्यतिरिक्त इतर अनधिकृत व्यवसाय चालू असलेबाबतच्या दिलेल्या अहवालावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०३-०८-२०१८) :** (१) होय

(२) नाही, १३ उद्योग बंद आहेत हे खरे आहे. मात्र, सर्व उद्योग नोंदणीकृत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव शहरात शासकीय आदिवासी वसतीगृहांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३२) १००२६५ (२९-१२-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरात खेडी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसर, सिंधी कॉलनी, शिव कॉलनी, सिध्दार्थनगर येथील शासकीय आदिवासी वसतीगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये असून वसतीगृहांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी कचरा साठलेला असणे, विद्यार्थ्यांना जीर्ण झालेल्या गाद्या दिलेल्या असणे, गळक्या तोट्या व छत तसेच दरवाजा विना प्रसाधन गृह असणे इ. गैरसोयी आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासकीय वसतीगृहाच्या अधिका-यांकडे विद्यार्थ्यांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व कार्यावाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१) जळगांव शहरात खेडी, शिवकॉलनी, सिध्दार्थ नगर येथे वसतिगृह भाडयाच्या इमारतीत कार्यरत आहे. परंतु सदर वसतिगृहांची दुरावस्था झाली हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. इमारत मालकांकडून तसेच गृहपालांकडून किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या वेळोवेळी करण्यात आलेल्या आहेत.
(३) किरकोळ स्वरुपाच्या तक्रारी विद्यार्थ्यांकडून आल्या होत्या, परंतु सदर तक्रारीवर उपाययोजना करुन तात्काळ तक्रारींचा निपटारा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील कनिष्ठ विद्यालये व महाविद्यालयांतील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत**

**(३३) १००७५० (०६-०१-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील कनिष्ठ विद्यालये व महाविद्यालयांतील सुमारे ३८ हजार मागासवर्गीय विद्यार्थी यांना सन २०१६-१७ या वर्षाच्या शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर विद्यार्थ्यांना तातडीने शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सन २०१६-१७ या वर्षात जळगांव जिल्हयात शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत ७९७८८ इतक्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी ऑनलाईनद्वारे अर्ज नोंदणी केली असून त्यापैकी मार्च २०१८ अखेरपर्यंत ७०४७७ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. उर्वरित ९३११ इतके प्रलंबित प्रस्ताव निकाली काढण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**हिंगोली जिल्हयातील समाज कल्याण विभागातील तत्कालीन लिपिकाने केलेला आर्थिक गैरव्यवहार**

**(३४) १००७६८ (१८-०१-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील समाज कल्याण विभागातील तत्कालीन लिपिक श्री.शेषराव एस. इंगोले हे आर्थिक गैरव्यवहार करुन शिष्यवृत्तीची देयके मंजुर करत असून ते परगावाहून ये-जा करीत असतानाही नियमबाह्य पद्धतीने शासनाकडून घरभाडे घेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,लोकप्रतिनिधी तथा जिल्हा दक्षता व सनियंत्रण समिती, हिंगोली यांच्या शैक्षणिक संस्थेकडून देखील शिष्यवृत्ती मंजुरीसाठी श्री. शेषराव एस. इंगोले यांनी पैशाची मागणी केली असल्याची बाब जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीच्या दिनांक २२ ऑगस्ट, २०१६ च्या बैठकीत निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीच्या दिनांक ३ जानेवारी, २०१७ च्या आढावा बैठकीच्या इतिवृत्तामध्ये श्री. शेषराव एस. इंगोले यांना निलंबित केल्याची खोटी माहिती सादर करण्यात आली आहे तसेच शासन नियमाविरुद्ध घरभाडे भत्ता घेत असल्याबाबत संबंधितांविरुद्ध अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे हि खरे आहे काय,
(४) असल्यास, वरील दोन्ही मुद्द्यांबाबतचा अहवाल सहायक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण ,लातूर यांनी शासनात सादर केला असून त्यात काय नमूद केले आले, त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०६-२०१८) :** (१) नाही, अशा आशयाची तक्रार माहे डिसेंबर २०१७ मध्ये प्राप्त झाली आहे.
(२) अशा स्वरुपाची बाब हिंगोली जिल्हा दक्षता संनियंत्रण समितीच्या दिनांक २२.०८.२०१६ च्या बैठकीत चर्चिली गेली होती.
(३) हिंगोली जिल्हा दक्षता समितीच्या दिनांक ०३.०१.२०१७ च्या आढावा बैठकीच्या इतिवृत्तात श्री.इंगोलेयांना निलंबित केल्याचे नमूद आहे. परंतु त्यांना निलंबित करण्यात आलेले नसून त्यांच्याकडील शिष्यवृत्ती योजनेचा कार्यभार काढून तो श्री.राजुलवार, स.क.नि. यांच्याकडे देण्यात आलेला आहे. तसेच श्री.इंगोले हे हिंगोली येथे भाडयाच्या घरात राहत असल्याबाबत त्यांनी घरभाडयाच्या पावत्या सादर केलेल्या आहेत.
(४) श्री. इंगोले यांचे विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९, नियम १० नुसार खुलासा मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शिरोली औद्योगिक क्षेत्रातील (जि.कोल्हापूर) वसाहतीची झालेली दुरवस्था**

**(३५) १००८२६ (०३-०१-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोली औद्योगिक क्षेत्रातील (जि.कोल्हापूर) खड्डेमय रस्ते, इतरत्र पसरलेला कचरा व तुंबलेल्या गटारांमुळे वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या औद्योगिक क्षेत्रातील वसाहतीची देखभाल व दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) शिरोली औद्योगिक क्षेत्रात २०.६१ कि. मी. इतक्या लांबीचे रस्ते, पाणी पुरवठा, दिवाबत्ती इत्यादी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. औद्योगिक क्षेत्राच्या रस्त्यांच्या देखभाल व दुरूस्तीचे व देखभालीचे काम नियमीतपणे करण्यात येते. सदर औद्योगिक क्षेत्रात गटार बांधणे व रस्त्याचे पुर्न:अस्तरीकरण करणे या कामांचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेच्या प्रक्रियेत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ चे भूसंपादनातून चाकण नगरपरिषद हद्दीतील जागा वगळण्याबाबत

**(३६) १०१३०३ (०३-०१-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण (जि.पुणे) औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.५ चे भूसंपादन प्रस्तावित असून यामधील चाकण नगरपरिषद हद्दीतील जागा संपादित होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकण नगरपरिषद ही नव्याने स्थापन झालेली नगरपरिषद असून नवनिर्मित नगरपरिषदेमार्फत शहराचा सर्वांगीण विकास करण्याकरिता नैसर्गिक मर्यादा असून शहरातील भूसंपादन होणारी जमीन वगळण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री, उद्योग यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने चाकण शहरातील महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाची भूसंपादनाची प्रस्तावित जागा वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०६-२०१८) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
चाकण नगरपरिषद हद्दीतील मौजे चाकण या गावची १२९.४० हे. आर जागा प्रस्तावित आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) महामंडळाने जिल्हाधिकारी, पुणे व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडून अभिप्राय मागविलेले असून संबंधित खतेदारांच्या आक्षेपांचा विचार करून पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागाकडून अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यापीठांचे वाढीव शुल्क मिळाले नसल्याबाबत**

**(३७) १०१५९७ (०६-०१-२०१८). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून दरवर्षी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत पदव्युत्तर आणि पीएचडी च्या शिक्षणासाठी दिले जाणारे शैक्षणिक शुल्क, निर्वाह भत्ता आणि प्रवासभाडे देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियातील काही विद्यापीठांनी शुल्क वाढविल्यामुळे सदरहू वाढीव शुल्क विद्यार्थ्यांना मिळाले नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर शुल्क वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२८-०५-२०१८) :** (१) अंशतः होय, परदेश शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत निवड झालेल्या राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना संबंधित शैक्षणिक संस्थेने ऑफरलेटर मध्ये नमूद केलेल्या अभ्यासक्रमासाठी संपूर्ण शिक्षण फी, संबंधित शैक्षणिक संस्थेने किंवा भारत सरकारने परदेश शिष्यवृत्ती ठरवुन दिलेला किंवा परदेशातील दूतावासाने प्रमाणित केलेला निर्वाह भत्ता, विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी विमानप्रवास भाडे आणि इतर आकस्मिक खर्चासाठी दरवर्षी यु.के. साठी ११००जीबीपी व इतर देशांसाठी १५०० युएस डॉलर इतका खर्च देण्यात येतो.
(२) व (३) नाही, ऑस्ट्रेलिया मध्ये शिक्षण घेत असलेला १ विद्यार्थी व अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या ४ विद्यार्थ्यांची संबंधित विद्यापीठाने सन २०१७-१८ करीता मागील वर्षाच्या दुप्पटीने जास्त शिक्षण फी च्या रक्कमेची मागणी केली होती. याबाबत संबंधित विद्यार्थी व विद्यापीठाकडून खुलासा घेण्यात येवून आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्यामार्फत त्यांना शिष्यवृत्ती मंजूर करुन अदा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**तुमसर (जि.भंडारा) येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतीगृहाची प्रवेशक्षमता वाढविण्याबाबत**

**(३८) १०२१५४ (२९-१२-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) येथील शासकीय आदिवासी मुलींच्या वसतीगृहाची प्रवेशक्षमता वाढविण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) वसतीगृह प्रवेशासाठी उपलब्ध क्षमतेपेक्षा अतिरिक्त मागणी पाहता आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून कार्यरत असलेल्या शासकीय वसतीगृहांची साधारणत: २०,००० विद्यार्थी क्षमता वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

तथापि, अधिक क्षमतेच्या वसतीगृहासाठी शहरामध्ये भाड्याची जागा मिळविणे, भाड्याच्या इमारतीसाठी भाड्याची रक्कम देणे, वसतीगृहाच्या व्यवस्थापनासाठी कर्मचारी नियुक्ती व त्यांचे वेतन व भत्ते अशा प्रकारचे शासनाचे खर्च कमी करण्यासाठी, क्षमता वाढ करण्याऐवजी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहीत्य उपलब्ध करुन घेण्यासाठी थेट रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून मंत्रीमंडळाच्या मान्यतेने पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना सुरू करण्यात आलेली आहे.

सन २०१८-१९ पासून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील बंद पडलेल्या एनटीसी सुतगिरण्या कार्यान्वित करण्याबाबत**

**(३९) १०२६६७ (०६-०१-२०१८). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बंद पडलेल्या एनटीसी सुतगिरण्या कार्यान्वित करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०२-०८-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) बीआयएफआर ने दिलेले आदेश व केंद्र शासनाच्या मंजुरीनुसार आरबीबीए मिल्स, हिंगणघाट नांदेड टेक्सटाईल मिल्स, नांदेड चाळीसंगांव टेक्सटाईल मिल्स, चाळीसगांव एसआर मिल्स, अकोला व धुळे टेक्सटाईल मिल्स, धुळे या बंद मिल्स जेव्ही मिल्स म्हणून घोषित केलेल्या आहेत. त्यानुसार जेव्ही मिल्स व केंद्र शासन यांच्यात एक सामंजस्य करार (MOU) झालेला होता. सदर सामंजस्य करारातील (MOU) अटी व शर्तीनुसार बंद पडलेल्या मिल्सचे आधुनिकीकरण हे संयुक्त उपक्रमाच्या माध्यमामार्फत करावयाचे होते. तथापि जेव्ही मिल्सने सदर समझोता करारातील अटी/शर्ती पूर्ण केल्या नाहीत. त्यामुळे जेव्ही मिल्स सोबत झालेला सामंजस्य करार (MOU) रद्द करण्यात आला. सामंजस्य करार (MOU) रद्द केल्याविरुध्द जेव्ही मिल्सने मा. उच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे न्यायालयीन प्रकरण दाखल केले असून, सदर न्यायालयीन प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ठ आहे.तसेच सदर बाब ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे.

---

### ठाणे व पालघर जिल्ह्यातील वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणेबाबत

**(४०) १०२७५३ (०६-०१-२०१८). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे व पालघर जिल्ह्यातील ७४ शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली मात्र ४२ हजार ७३४ शेतकरी अद्यापी कर्जमाफीपासून वंचित असल्याची बाब ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वंचित शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (११-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ अंतर्गत ठाणे व पालघर जिल्ह्यातील ३२३७९ शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम रूपये १०४ कोटी ५५ लाख जमा करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे शासकीय औद्योगिक वसाहत स्थापन करण्याबाबत

**(४१) १०३३९६ (०४-०१-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथे शासकीय औद्योगिक वसाहत होण्याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अनेक वर्षांपुर्वी सर्वेक्षण केलेले असून त्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनमाड येथे शासकीय औद्योगिक वसाहत होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे शासकीय औद्योगिक वसाहत उभारण्याचा महामंडळाचा प्रस्ताव नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील हेरिटेज वारसाच्या यादीतील मुंबै बँकेच्या इमारतीचे अनधिकृत व विनापरवानगी बांधकाम केल्याबाबत

**(४२) १०५३१४ (०४-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील मुबै बँकेचे मुख्यालय, दादाभाई नौरोजी मार्गावरील इमारत हेरिटेज वारसाच्या वास्तूमधील यादीत समाविष्ट असूनही बँकेने अनधिकृत व विनापरवानगीने २५ लाख रुपये खर्च करुन सभागृह बांधले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी तक्रार करून सुध्दा अद्यापही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बांधकामाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०७-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
बँकेने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर छोट्या सभागृहाचे बांधकाम परवानगी न घेता केल्याचे खरे आहे. तथापि, सदरचे बांधकाम मुंबई महानगरपालिकेच्या आदेशाने काढून टाकण्यात आल्याने सध्या बांधकाम अस्तित्वात नाही.
(२) नाही.

(३) सदर प्रकरणी उपनिबंधक, सहकारी संस्था, अे विभाग, मुंबई यांचेकडून प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीमध्ये आढळले की, बँकेने परवानगी न घेता सन २०१६.१७ मध्ये बांधकाम केले होते. त्याबाबत मुंबई महानगरपालिकेने दिनांक २२/०७/२०१६ रोजी बँकेस नोटीस दिली. या नोटीसीनुसार बांधकाम थांबवले असल्याचे मुंबई महानगर पालिकेला कळविले. त्याचप्रमाणे मुंबई महानगर पालिकेकडील दिनांक ०८/०९/२०१६ च्या आदेशाप्रमाणे बांधकाम काढून टाकले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती व जमातीच्या विकासासाठी तेलंगणा राज्याच्या धर्तीवर उपयोजना कायदा पारित करण्याबाबत**

**(४३) १०६९२४ (२३-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती व जमातीच्या विकासासाठी, तेलंगणा राज्याच्या धर्तीवर अनुसूचित जाती व जमातीसाठी उपयोजना कायदा पारित करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक सेवाभावी संस्था, संघटना कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींनी याबाबत अनेक ठिकाणी सनदशीर मार्गानी मोर्चे, धरणे, बैठका आयोजीत करुन अनुसूचित जाती व जमाती उपयोजना कायदा पारित करण्याबाबत शासनास निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२७-०७-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) तेलंगणा राज्याच्या धर्तीवर राज्यात अनुसूचित जाती घटक कार्यक्रमासंदर्भात "महाराष्ट्र अनुसूचित जाती घटक कार्यक्रम (नियोजन, वाटप आणि वित्तीय साधनसंपत्तीचा वापर) अधिनियम, २०१७" तयार करून वित्त, विधी व न्याय विभागाचे अभिप्राय विचारात घेऊन, प्रारूप अधिनियम मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत २७ कोटी ३२ लाखाचा व्याज परतावा प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) १०७४०१ (१७-०४-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत २७ कोटी ३२ लाखाचा व्याज परतावा प्रलंबित असल्यामुळे विकास संस्थांनी संबंधित कर्जदार शेतकऱ्यांकडून व्याज वसूल करुन देखील सन २०१५-२०१६ या वर्षाचे पैसे मिळाले नसल्याने जिल्हयातील १ लाख ८४ हजार शेतकरी परताव्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार व्याज परताव्यापोटी शेतकऱ्यांना देय असलेली रक्कम देण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०६-२०१८) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सन २०१५-२०१६ या कालावधीमधील योजनेस पात्र असणाऱ्या २,०७,६६३ इतक्या शेतकऱ्यांना रू.२७,०७,६८,०५१/- इतक्या रकमेचा लाभ देण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या भरती प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(४५) १०७९०३ (२३-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेतील लिपिक, कनिष्ठ अधिकारी, प्रथम व व्दितीय श्रेणी अधिकारी या ४६४ पदांसाठी राबविलेल्या भरती प्रक्रियेत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपाध्यक्ष यांची मुले गुणवत्ता यादीत आल्याने सहकार विभागाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास उक्त भरतीला स्थगिती दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरती प्रक्रियेत सर्व पदांसाठी सारखीच पात्रता देण्यात आली असून ही जाहिरात संशय निर्माण करणारी असल्याने याबाबतची माहिती माहितीच्या अधिकारात मागितली असता नाशिक येथील विभागीय सहनिबंधक कार्यालयाने मुख्य दस्त वगळून इतर माहिती दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चार सदस्यीय समितीमार्फत या भरती प्रक्रियेची चौकशी समिती नेमली असून त्यासंदर्भातील अहवाल नाशिकच्या सहनिबंधकांना दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१२-०७-२०१८) :** (१) अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भरती प्रक्रियेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीची चौकशी पूर्ण होईपर्यंत बँकेच्या भरती प्रक्रियेस स्थगिती देण्याबाबतचे निदेश दिनांक ३०/१०/२०१७ रोजी देण्यात आलेले आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
माहिती अधिकार कायद्यातील तरतूदीनुसार उपलब्ध असलेली माहिती माहितीच्या अधिकारात देण्यात आलेली आहे.
(३) होय.
(४) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या दिनांक २७/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये बँकेच्या नोकर भरती प्रक्रियेत अनियमितता व सदर प्रक्रिया ही सदोष व गैरहेतूने प्रेरीत असल्याचे स्पष्ट होत असल्याचे नमूद करून सदर नोकर भरती रद्द करणेबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना कळविले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने तसेच चौकशी अहवाल व चौकशी अधिकाऱ्यांनी नोंदविलेल्या निष्कर्षानुसार सदर भरती प्रक्रिया रद्द करण्यात येत असल्याचे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेविरूध्द प्रशासकीय कारवाई करण्याबाबत दिनांक २८/०२/२०१८ च्या पत्रान्वये बँकेस कळविण्यात आले आहे.
नोकर भरतीची बाब सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा, वसतिगृहे यामध्ये अधिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४६) १०८०४४ (१७-०४-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील शासकीय आश्रमशाळा, वसतिगृहे यामध्ये अधिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय वसतिगृहे व आश्रमशाळा ही भाडयाच्या इमारतीत सुरु आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याकरिता तसेच वसतिगृहांना व आश्रमशाळांना स्वतःची जागा उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (३०-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यात या विभागाची एकही शासकीय आश्रमशाळा नाही. आणि शासकीय वसतीगृहातील अधीक्षकाचे पद भरलेले आहे.
(२) व (३) होय. वसई येथे कार्यरत असलेले शासकीय वसतीगृह हे भाडयाच्या इमारतीत सुरु असून, सदर वसतीगृहाच्या बांधकामासाठी भुखंड मिळण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम विदयार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत**

**(४७) १०९१६८ (२३-०४-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम विदयार्थ्यांच्या बँक खात्यात प्रथम जमा करावी व महाविदयालयांची देय असलेली रक्कम विदयार्थ्यांच्या खात्यातून काढून महाविद्यालयाच्या बँक खात्यात जमा करावी असा आदेश शासनामार्फत काढला असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सदर शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांनी खर्च केली तर शिक्षण संस्थांना रक्कम कशी द्यावी असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदरील आदेश मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०७-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे, महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थ सहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्ष्यित वितरण) अधिनियम, २०१६ च्या तरतूदीनुसार केंद्र व राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता व विद्यावेतने या योजनेंतर्गत पात्र अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या लाभाच्या रकमा थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्याच्या सूचना दिनांक ०७.०८.२०१७ व दिनांक २९.१.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केल्या आहेत.

त्याअनुषंगाने, महाविद्यालयांकडुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या छाननी व मंजूरी अंती संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत पात्र विद्यार्थ्यांची अनुज्ञेय शिष्यवृत्ती (शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क,निर्वाहभत्ता इ.)/ शिक्षण फी, परिक्षा फी ची रक्कम तात्काळ संबंधित विदयार्थ्याच्या आधार संलग्न बॅन्क खात्यावर जमा केली जाईल. तद्नंतर, विद्यार्थ्यांने दिलेल्या बंधपत्रानुसार, विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झालेली महाविद्यालयाच्या फी ची रक्कम, संबंधित विद्यार्थ्यांने कार्यालयीन सात दिवसांच्या आत महाविद्यालयास जमा करणे बंधनकारक आहे.

(२) नाही,

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणार (जि.बुलढाणा) येथील तहसिल कार्यालयांतर्गत संजय गांधी निराधार योजनेत गैरकारभार सुरु असल्याबाबत

**(४८) १०९५०४ (२३-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) येथील तहसिल कार्यालयांतर्गत दलालांच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजनेचा अनेक जण नियमबाहयरित्या लाभ घेत असून काही मृतकांच्या नावावरही लाभ घेतल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील शासकीय योजनांची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(४९) १०९७०९ (२३-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, इंदिरा गांधी विधवा योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी अपंग योजना, संजय गांधी अपंग योजना तसेच इतर शासकीय योजनांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले, त्यानुषंगाने उक्त प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२६-०७-२०१८) :** (१) व (२) मालेगांव तालुक्यामध्ये मार्च, २०१८ पर्यंत संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत ३०१६ ग्रामस्थांनी अर्ज केले आहेत. त्यापैकी संजय गांधी निराधार अनुदान समितीने वेळोवेळी बैठका घेऊन २२७८ प्रकरणे निकाली काढली असून ७३८ प्रकरणे प्रलंबित आहेत. प्रलंबित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयातील बुटीबोरी येथील होली क्रॉस कॉन्व्हेंट या नामांकित शाळेतील रखवालदाराने विद्यार्थ्याचे लैगिंक शोषण केल्याबाबत

**(५०) १०९९८३ (१८-०४-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळण्यासाठी त्यांना नामांकित शाळेमध्ये दाखल करण्याच्या योजनेतंर्गत नागपूर जिल्हयातील बुटीबोरी येथील होली क्रॉस कॉन्व्हेंट शाळेमध्ये कु.दानेस रामभुषण उईके या आदिवासी विद्यार्थ्याला सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ६ वीमध्ये प्रवेश देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होलीक्रॉस शाळेच्या निवासी वसतीगृहाचे रखवालदार होमदेव पडोले याने अनेकवेळा जिवे मारण्याची धमकी देऊन लैगिंक अत्याचार केले असल्याबाबतची तक्रार या विद्यार्थ्याने वसतीगृहाचे गृहपाल, मुख्याध्यापक व संस्थाचालकांकडे तसेच बुटीबोरी पोलीस स्टेशनमध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत विभागीय आयुक्त नागपूर यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास एकसदस्यीय चौकशी समिती नियुक्त केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त समितीने दिलेल्या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने याप्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०७-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) प्रस्तुत घटनेच्या अनुषंगाने सदर शाळेतील रखवालदार, संस्थाचालक, मुख्याध्यापिका व अधिक्षिका यांच्याविरूद्ध अपराध क्र.९०८/२०१६ कलम ३७७, ५०६ व ३४ भा.द.वि. सहकलम ५(२) (घ), ६,८ प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्सस ॲक्ट, २०१२ व कलम ३ अन्वये पोलिस स्टेशन बुटीबोरी येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे विभागाचे प्रकल्प अधिकारी, देवरी आणि प्रकल्प अधिकारी, अहेरी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यापैकी प्रकल्प अधिकारी, अहेरी यांचा खुलासा मान्य करण्यात आला असून प्रकल्प अधिकारी, देवरी यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.